# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:15.09.2025** **वार:सोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगाल आणि बिहारच्या दौऱ्यावर
2. संरक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी संरक्षण खरेदी नियमावलीला मंजुरी
3. महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून आचार्य देवव्रत यांचा आज शपथविधी
4. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर विजय; भारतीय संघाकडून हा विजय भारतीय सैन्य दलाला समर्पित आणि
5. महाराष्ट्रासह देशाच्या इशान्ये कडील राज्यांना पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कोलकाता इथं संरक्षण दलाच्या संयुक्त कमांडरर्स परिषदेला संबोधित करणार आहेत. भारतीय लष्कराच्या पूर्व कमांड मुख्यालय, असलेल्या विजय दुर्ग इथं कमांडर्स परिषदेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. ही परिषद 17 सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह या कार्यक्रमात उपस्थित राहतील. या कार्यक्रमांत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान काल संध्याकाळी कोलकाता इथं पोहोचले. जगातिक स्तरावर सध्या सुरु असलेल्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तांत्रिक प्रगती, सशस्त्र दलांच्या तिन्ही शाखांमधील समन्वय, आधुनिकीकरण आणि इतर पैलूंवर चर्चा होणार आहे. त्यानंतर पंतप्रधान आज बिहारच्या दौऱ्यावर जाणार आहेत. पूर्णिया जिल्ह्यात 36 हजार कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचा शुभारंभ करतील. उत्तर बिहारमध्ये नव्याने विकसित झालेल्या विमानतळाचं उद्घाटन आणि राष्ट्रीय मखाना मंडळाचं उद्घाटनही मोदींच्या हस्ते होणार आहे.

**<u>सेवा-पर्व</u>**

सेवा आणि सुशासान हा मंत्र जपत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार सर्वसमावेशक प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. पर्यावरण आणि जैवविविधतेचं रक्षण करण्यासाठी सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. ऐकुया याबाबत एक वृत्तांत....

**पृथ्वी आपली माता आहे या संस्कारातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण रक्षणाच्या उद्देशाने देशात अनेक पावले उचलली जात आहेत....**

**भारत की धरती पर चिता लौट आए और इन चितों के साथ ही भारत की प्रकृति प्रेमी चेतना भी पूरी शक्ति से जाग्रत हो उठी है.**

**वाघ आणि सिंहांच्या तसंच चित्ता रक्षणासाठी विविध प्रकल्प राबवले जात आहेत. या प्राण्याचा अधिवास मजबूत करणं, लुप्त होत असलेल्या प्रजातींचं रक्षण करणं यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळे आज, भारतात वाघांची संख्या जगात सर्वात जास्त आहे. गेल्या दशकांत आशियाई सिंहांच्या संख्येत 70 टक्क्यांनी वाढ नोंदवण्यात आली असून त्यांची**

**संख्या 891 एवढी झाली आहे. तर सात दशकांनंतर चित्त्यांना परदेशातून स्थलांतरित करून आणण्यात आलं आणि त्यांची प्रजाती आता वाढत आहे. पाणथळ जागांचं संरक्षण, 'एक पेड माँ के नाम' मोहिमेअंतर्गत 142 कोटींहून अधिक वृक्षलागवड यासारख्या उपक्रमातून केंद्र सरकार हरित, सुदृढ आणि अधिक सुरक्षित भविष्य घडवण्यासाठी काम करत आहे.**

**संरक्षण नियमावली**

आत्मनिर्भर भारत या संकल्पनेद्वारे संरक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी संरक्षण खरेदी नियमावलीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल मंजुरी दिली. यामुळे संरक्षण क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या सेवांसाठी खरेदी जलद होईल, सोप्या प्रक्रियेद्वारे देशांतर्गत उद्योग सक्षम होतील, नाविन्यपूर्ण संशोधनाला प्रोत्साहन मिळेल आणि उद्योगांना पाठिंबा मिळेल असं संरक्षण मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे. सुधारित नियमावली आधुनिक काळातील युद्धामध्ये सशस्त्र दलांच्या वाढत्या गरजा पूर्ण करेल असंही यात म्हटले आहे. यामुळे तीनही दलांसाठी आवश्यक उत्पादनांच्या निर्मितीसाठी जलद निर्णय घेता येतील. संरक्षण सेवा आणि संरक्षण मंत्रालयाअंतर्गत इतर संस्थांकडून वस्तू आणि सेवा खरेदी या नियमावलीद्वारे नियंत्रित केली जाते.

**दूरदर्शन**

देशभरातील गावागावात पोहोचलेल्या दूरदर्शनच्या गौरवशाली प्रवासाची 66 वर्षे आज पूर्ण होत आहेत. 15 सप्टेंबर 1959 रोजी दूरदर्शनच्या माध्यमातून भारतीय प्रसारण युगाची सुरुवात झाली. आज, दूरदर्शन भारतातील सर्वात मोठी प्रसारण संस्था आहे, ज्यामध्ये स्टुडिओ आणि ट्रान्समीटरचे विस्तृत नेटवर्क आहे. देशभरातील सर्व शहरं आणि प्रादेशिक क्षेत्रं तसेच आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांपर्यंत दूरदर्शन पोहोचलं असून आता मोबाइल अपच्या माध्यमातूनही दूरदर्शनचे कार्यक्रम पाहणं शक्य झालं आहे.

**जीएसटी आयुर्वेद**

केंद्र सरकारकडून येत्या 22 तारखेपासून वस्तू आणि सेवाकराचे सुधारित दर लागू होणार आहेत यामुळे आयुर्वेद, युनानी आणि होमिओपॅथी या वैद्यकीय शाखांमध्यील उत्पादनांच्या किमतीत बदल होणार आहेत. सामान्य नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून राबवल्या गेलेल्या या सुधारणांमुळे या तीनही शाखांतील औषधांवरील कर 12 टक्क्यांवरून पाच टक्के झाला आहे. तर दंतशल्यचिकित्सा आणि पशुवैद्यकीय उपचारांसाठी आवश्यक उपकरणे तसंच वैद्यकीय वापराच्या ऑक्सिजनवरील कर आता 12 टक्क्यांवरून 5 टक्के करण्यात आला आहे. या कर कपातीमुळे कमी उत्पन्न गटातल्या कुटुंबांना फायदा होईल शिवाय औषध आणि वैद्यकीय उपकरण क्षेत्रातील देशांतर्गत उत्पादनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

**राज्यपाल देवव्रत**

गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकरणार आहेत. आचार्य देवव्रत यांचं काल अहमदाबादहून मुंबईत आगमन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई सेंट्रल स्थानकावर पुष्पगुच्छ देऊन त्यांचं स्वागत केलं. आज सकाळी 11 वाजता आचार्य देवव्रत महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेणार आहेत.

**कतार**

कतारची राजधानी दोहा इथं पॅलेस्टिनी अतिरेकी गट हमासवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर कतारला पाठिंबा देण्यासाठी अरब-इस्लामिक देशांचे नेते आज दोहा इथंबैठक घेणार आहेत.आपत्कालीन शिखर परिषदेची सुरुवात काल यादेशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीने झाली. शिखर परिषदेत कतारवरील इस्रायलच्या हल्ल्याशी संबंधित ठरावावर विचारविनिमय केला जाईल. असं कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते माजेद अल-अन्सार यांनी काल सांगितलं. शिखर परिषदेला उपस्थित राहणाऱ्या नेत्यांमध्ये इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान आणि इराकचे पंतप्रधान मोहम्मद शिया अल-सुदानी यांचा समावेश असेल. तुर्कीचे अध्यक्ष रेसेप

तय्यिप एर्दोगान देखील दोहा येथे असतील, परंतु बैठकीत त्यांची उपस्थिती अद्याप निश्चित झालेली नाही. कतारमध्ये इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यानंतर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो काल इस्रायलला पोहोचले आहेत.

**गोयल माध्यम परिषद**

2047 पर्यंत तीस ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था म्हणून भारत उदयाला येईल, असा पुनरूच्चार वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी केला आहे. ते काल दिल्लीत एका खासगी माध्यम संस्थेने आयोजित केलेल्या वार्षिक परिषदेच्या चर्चासत्रामध्ये बोलत होते. जीएसटीतील नवीनतम सुधारणांमुळे करप्रणाली सुलभ झाली असून, जीएसटी लागू करणे हे मोठे परिवर्तन होते. त्यामुळे भ्रष्टाचार कमी होईल आणि मध्यस्थांना चाप बसेल. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना देण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. असंही ते म्हणाले.

**क्रिकेट**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतील ग्रुप एच्या सामन्यात काल भारताने पाकिस्तान संघावर 7 गडी राखून विजय मिळवला. दुबईमध्ये झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तान संघानं 19 षटकं आणि 3 चेंडूत 127 धावा केल्या. ही लक्ष्य पार करताना अभिषेक शर्मा आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने 25 चेंडू शिल्लक असतानाच हा विजय मिळवला. हा विजय भारतीय सैन्यदलाला समर्पित करत असून पेहलगाम हल्ल्यातील पीडितांच्या कुटुंबियांसोबत संघ उभा असल्याचं कर्णधार सुर्यकुमार यादव यानं सांगितलं.

**हॉकी**

चीनमधील हांगझोऊ इथं महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय महिला हॉकी काल झालेल्या सामन्यात यजमान चीनविरुद्ध 1-4 असा विजय मिळवला. रौप्य पदकावर नाव कोरत अंतिम फेरी गाठली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय महिला हॉकी संघाचे रौप्य पदक मिळवल्याबद्दल समाजमाध्यमावरील संदेशात अभिनंदन केलं आहे. दृढनिश्चय आणि सांघिक भावना असलेल्या भारतीय महिला हॉकी संघाचा देशाला अभिमान आहे. असंही त्यांनी म्हटलं आहे.

**मुष्टीयुध्द**

इंग्लंडमधील लिव्हरपूल इथं सुरू असलेल्या मुष्टीयुध्द अजिक्यपद स्पर्धेत जास्मिन लांबोरियाने पॅरिस ऑलिंपिक रौप्यपदक विजेती पोलंडची ज्युलिया जरेमेटाला हरवून फेदरवेट प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. दरम्यान, मीनाक्षी हुड्डाने काल 48 किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत कझाकस्तानच्या नाझिम कैझेबेला पराभूत करून सुवर्णपदक जिंकलं.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्र आणि इशान्ये कडील राज्यांना पुढील तीन दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा,अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, बिहार, पश्चिम बंगालचा काही भाग, सिक्कीम आणि उत्तराखंडमध्ये आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर उद्या विदर्भ, तेलंगणा, उत्तर कर्नाटक, नागालँड, मध्य प्रदेश, झारखंड, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेशच्या काही भागात जोरदार पावासाचा इशाला दिला आहे. राजस्थानच्या काही भागातून नैऋत्य मोसमी पाऊस राजस्थानातून परतला आहे तर येत्या दोन तीन दिवसांत पंजाबचा काही भाग आणि गुजरातमधून तो परत फिरेल, असाही अंदाज वेधशाळेने वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार